नाट्यवार्ता

एकपात्री अभिनय स्पर्धा

जागतिक रंगभूमी दिनानिमित्त रविवार, २७ मार्च रोजी 'अवतरण-१०१'ने एकपात्री अभिनय स्पर्धा आयोजित केली आहे. ब्राह्मण सभा, मालाड पश्चिम (पोलीस स्टेशनच्या समोर), मुंबई येथे दुपारी २ वा.पासून सुरू होणारी ही स्पर्धा १६ वर्षांवरील सर्वांसाठी खुली असून, प्रवेश शुल्क रु. ५०/- प्रवेश अर्जासोबत देणे आवश्यक आहे. सर्वोत्कृष्ट तीन स्पर्धकांना अनुक्रमे रु. ५०१/-, ३५१/- व २०१/- अशी रोख पारितोषिके आणि आकर्षक मानचिन्हे प्रशस्तिपत्रासह देण्यात येतील. त्याचबरोबर उत्तेजनार्थ पाच पारितोषिके रोख रु. ५१/- व प्रशस्तिपत्राच्या स्वरूपात देण्यात येतील. स्पर्धकांनी प्रवेश अर्जासाठी पुढील ठिकाणी सायंकाळी ६ ते ८ या वेळात संपर्क साधावा. संभाजी सावंत, ४३, 'आश्रय', सेक्टर ३, चारकोप (मार्केट), कांदिवली (प.), फोन : २८६७६७००, विजय लाड, ११, 'साईधाम', राममंदिर रोड, बाभई, बोरिवली (प.), फोन : २८९८२८८५, दिपाली राणे, १५३ बी/५१३३, नेहरू नगर, कुर्ला (पू.), फोन : २५२२०५३२, रूपा सावंत, १०३ अ, 'स्वामीमनोर', अ. कृ. सावंत मार्ग, शिवाजी मंदिरसमोर, दादर, फोन : २४३७१२४४.

रंगकर्मींची समन्वय समिती स्थापन

नाटक, एकांकिका, मराठी- हिंदी वाद्यवृंद, एकपात्री, द्विपात्री कार्यक्रम आदी रंगमंचावर सादर होणाऱ्या कलाकृतींची निर्मिती करणाऱ्या निर्मात्यांची व सर्वसंबंधितांची एक सभा अलीकडेच मराठी नाट्य-व्यावसायिक निर्माता संघातर्फे आयोजित करण्यात आली होती. या सभेत रंगमंचावर सादर होणाऱ्या कार्यक्रमांच्या अडचणींवर सांगोपांग चर्चा झाली. जाहिरातींचे दर, नाट्यगृहांची भाडी, दौऱ्यांमध्ये येणाऱ्या समस्या, तिकिटांचे दर आदी गोष्टी विचारात घेऊन व्यवसाय सुस्थितीत ठेवण्यासाठी अनेक प्रस्ताव मांडले गेले आणि एकमुखाने ते संमतही झाले. भविष्यात येणाऱ्या अडचणी सर्वांनी एकत्र येऊन सोडवाव्यात म्हणून एक समन्वय समितीही यावेळी स्थापन केली गेली. तीत प्रभाकर पणशीकर, सुधीर भट, विनय आपटे, मच्छिंद्र कांबळी, अशोक हांडे, पुरुषोत्तम बेर्डे, विजय पाध्ये, शरद उपाध्ये, दिनू पेडणेकर आणि प्रदीप कबरे यांचा समावेश आहे. या समितीने ठरवून दिलेल्या नियमावलीनुसारच व्यवसाय करण्याचे उपस्थित निर्माते, व्यवस्थापक, ठेकेदार व कलाकारांनी मान्य केले आहे.

दिशा थिएटर्सचा वर्धापनदिन

दिशा थिएटर्स या संस्थेचा पहिला वर्धापनदिन नुकताच ठाण्याच्या गडकरी रंगायतनमध्ये साजरा झाला. दिशा थिएटर्सने वर्षभरात तीन दर्जेदार अभिनित 'सासू पाहून लग्न करा' सुधीर जोशी, आनंद अभ्यंकर यांचे प्रदीप दळवी लिखित 'प्रिय पप्पा' या नाटकांची निर्मिती केली. वर्धापनदिनी [illegible] यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून 'स्वर आले जुळूनी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ठाण्याचे महापौर राजन विचारे यांच्यासह नाट्यलेखक मधुकर देशमुख, एकनाथ काजारी, लेखक-दिग्दर्शक संतोष पवार आदी यावेळी उपस्थित होते. संस्थेचे सूत्रधार संदीप विचारे आणि त्यांची कन्या अंकिता यांनी भेटवस्तू देऊन मान्यवरांचा सत्कार केला.

अभिनय प्रशिक्षण शिबीर

अर्चना आर्ट अॅकॅडमीने १५ ते ३० एप्रिल या कालावधीत बोरिवली, दादर, ठाणे, कल्याण येथे अभिनय प्रशिक्षण शिबीर आयोजित केले आहे. शिबिरार्थींकडून केवळ प्रवेश मूल्य आकारले जाईल. इच्छुकांनी २० मार्चपर्यंत अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा. अर्चना दळवी : ९८६९९८३५६६, अरविंद मोहिते : ९८९१५६६४८७, रवींद्र पवार : ९३२४६०७५७३.

अभिनय प्रशिक्षण शिबीर

एम. आर. प्रॉडक्शन (मुंबई)तर्फे 'अभिनय प्रशिक्षण वर्गा'चे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात रंगमंचावरील वावर, आवाजाची काळजी, अभिनयाचे विविध पैलू, संगीत, नेपथ्य, समीक्षण, निवेदन, सूत्रसंचालन, नृत्य, स्मरणशक्ती, वाचिकाचा विकास, संमोहन, प्रकाशयोजना, लेखन, दिग्दर्शन आदींचे मार्गदर्शन या क्षेत्रातील मान्यवर करणार आहेत. शिबिर बोरिवली, पार्ले, दादर, वाशी, ठाणे, कल्याण येथे घेण्यात येणार असून त्याचा कालावधी १६ दिवसांचा असेल. शिबिर १ एप्रिलपासून सुरू होणार असून २५ मार्चपर्यंत शिबिरार्थींना प्रवेश घेता येईल. संपर्क- सूत्रधार/ [illegible] : ९८६९३५३९२४, रवींद्र पवार- ९३२४६०७५७३.

'सन्मान हौस'

श्याम मनोहरी शैलीतला 'अप'मान!

नाट्यरंग

■ रवींद्र पाथरे

प्रत्येक माणूस हा लोकांनी आपल्याला मान द्यावा, आपल्याला सन्मानानं वागवावं, कुणीतरी आपलं भरभरून कौतुक करावं, यासाठी भुकेलेला असतो. माणसांची ही अपेक्षा कधी रास्त असते, तर कधी कधी अवाजवीही! माणूस कितीही छोटा- मोठा असला तरी त्याला मान मिळवण्याची आस असतेच. 'कलप' निर्मित 'सन्मान हौस' या नाटकात नाटककार श्याम मनोहर यांनी आपल्या खास 'मनोहरी' शैलीत या हौसेचा खरपूस समाचार घेतला आहे.

दिनकर धनपुरे हे नोकरीतील निवृत्ती समीप आलेले गृहस्थ! त्यांच्या निवृत्तीला अवघे तीन महिने उरलेत. नोकरीत पदोपदी त्यांच्या वाट्याला अपमान आलेले असतात. त्यामुळे कधी एकदा ही नोकरी संपतेय, याची ते चातकासारखी प्रतीक्षा करत असतात. घरात बायको आशा मात्र त्यांना 'अहो- जाहो' करून त्यांचा मान ठेवत असते. त्यांचा मुलगा सुहास, त्याची बायको नंदिनी आणि नातू मकरंद हे अमेरिकेत असतात. त्यामुळे घरात ती दोघंच... एकमेकांचा मान सांभाळायला! निवृत्तीनंतर नव्यानं आपल्याला हवं तसं आयुष्य जगायचं, असा बेत उभयतांनी आखलेला असतो. नवऱ्याला तरुण झाल्यासारखं वाटावं म्हणून आशा त्यांना 'ए दिनू' म्हणून हाक मारण्याचं ठरवते. तिचं हे म्हणणं त्यांना पटतं. परंतु तिनं फक्त घरातच हे संबोधन वापरावं, बाहेर मात्र 'अहो- जाहो'च करावं, असं ते सुचवतात. नाहीतर लोक काय म्हणतील, याची त्यांना भीती वाटते. मात्र, निवृत्तीपर्यंत तरी तिनं आपल्याला आदरार्थी संबोधावं, असंही ते सुचवतात. कारण तोवर तरी आपल्याला कुणीतरी मान देतंय, ही सुखद भावना त्यांना अनुभवायची असते.

दरम्यान, त्यांची सून नंदिनी माहेरच्या एका लग्नासाठी भारतात येते. परंतु ती येते ती मुलाला घेऊन थेट आपल्या आईकडेच उतरते. त्यामुळे आशाला आपला अपमान झाल्यासारखं वाटतं. नंदिनीसमोर आशानं आपल्याला एकेरी हाक मारू नये, असं बजावूनही आशा चुकून दिनकररावांना एकेरी हाक मारते आणि मग नंदिनीही त्यांना 'ए दिनू', 'ए आशा' म्हणून संबोधायला लागते. तेव्हा आशाला आपला भयंकर अपमान झाल्यासारखं वाटतं. सुनेनं सासू-सासऱ्यांना एकेरीत हाक मारावी म्हणजे काय? दिनकरराव मग आशाला समजावतात की, 'यात चूक तुझीच आहे. तू जर मला एकेरीत हाक मारली नसतीस तर नंदिनीनंही तशी हाक मारली नसती. तिला वाटलं- आपले सासू- सासरे एकमेकांना एकेरीत हाक मारताहेत, तेव्हा ते मॉडर्न झालेत! म्हणून मग तिनंही आपल्याला एकेरीत हाक मारली असावी.'

दिनकरराव आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एकेकाळी केलेल्या आपल्या अपमानाचा बदला त्यांनी आता त्यांना सांगितलेलं काम न करून घेतात. आशालाही आपल्या हयात नसलेल्या सासूचा अपमान करायचाय. कारण त्यांनी तिचा कधीकाळी घोर अपमान केलेला असतो. परंतु हयात नसलेल्या व्यक्तीचा अपमान कसा करायचा, हे तिला कळत नाही.

त्यांच्या मुलानं- सुहासनं आपल्या शाळेला आईच्या नावे दिलेल्या पन्नास हजार रु.च्या देणगीमुळे आशाचा शाळेतर्फे सत्कार करण्यात येतो. त्याप्रसंगी शाळाचालक तिची तोंडभरून स्तुती करतात. त्यामुळे काही काळ तिला धन्य वाटतं. आपला कुणीतरी सन्मान केल्याच्या समाधानात ती कृतकृत्य होते. परंतु तिचा हा आनंद फार काळ टिकत नाही. शाळाचालकांनी केलेली ती स्तुती मुलानं दिलेल्या देणगीपायी होती, ती काही तिची खरी स्तुती नव्हती, असं तिला वाटतं.

तेव्हा तिला मान देण्यासाठी दिनकरराव पगारावर खास ब्राह्मण मोलकरीण बाई नेमतात. ही बाई एकच एक स्तुतीपर वाक्य सतत बोलून तिला हैराण करते. आणि वर तिलाच सुनावते की, खोटी स्तुती तरी किती करणार? त्यामुळे आशाचा मान मिळवण्याचा हा प्रयत्नही फोल ठरतो.

सर्वसामान्यांना मान मिळवण्यासाठी काहीतरी केलंच पाहिजे, असं त्यांना वाटू लागतं. सुहास भारतात एक बंगला बांधून त्याला 'सन्मान हाऊस' नाव देण्याचं ठरवतो. त्यावरून दिनकररावांना सुचतं की, आपण 'सन्मान हौस' हा व्यवसाय सुरू करावा आणि लोकांच्या मागणीनुसार त्यांना मान देण्याची सुविधा पुरवावी. त्यासाठी आपण मानधनही आकारावं. त्यांची ही कल्पना आशाला भयंकर आवडते. म्हणजे नोकरी संपल्यावर रिकामपण न येता नवा व्यवसायही करता येईल आणि लोकांना मान देता देता आपल्यालाही लोकांकडून मान मिळेल. ते 'सन्मान हौस'ची जाहिरात वर्तमानपत्रात देतात आणि तिला लोकांचा प्रचंड प्रतिसाद मिळतो. लोक मानासाठी किती आसुसले आहेत, ते यावरून त्यांना कळून चुकतं. परंतु, काही पुरुषांना खास स्त्रीकडूनच मान हवा असतो, तर काही गुंडांनाही मान हवा असतो. अशा विचित्र मागण्यांपुढे ते हैराण होतात. या व्यवसायातले संभाव्य धोके त्यांच्या लक्षात येतात. तेव्हा नको तो मान आणि नको तो मान देण्याचा व्यवसाय, असं त्यांना होतं...

लेखक श्याम मनोहर यांनी आपल्या खास 'मनोहरी' ब्लॅक कॉमेडी शैलीत लोकांच्या मानपानासाठी हपापलेपणाच्या प्रवृत्तीवर नाटकात चांगलेच कोरडे ओढले आहेत. व्यक्तिगत मान-अपमानाच्या कल्पना आणि त्यांतील विसंगती त्यांनी अचूक टिपली आहे. त्यातही आपल्यात खोलवर [illegible] स्वीकारण्याच्या मराठी प्रवृत्तीवर त्यांनी मार्मिकपणे बोट ठेवलं आहे. हे करत असतानाच सामान्य माणसाच्या मान-मर्यादा आणि त्यातून त्याची होणारी केविलवाणी घुसमट त्यांनी नाटकात अधोरेखित केली आहे. मानपानाच्या खऱ्या-खोट्या कल्पनांचीही त्यांनी भरपूर खिल्ली उडवली आहे. अधूनमधून ते परखड सामाजिक भाष्यही करून जातात. उदा. 'ब्राह्मणांना कुणाला मानच देता येत नाही' किंवा 'शिवाजीमहाराज, आंबेडकर आणि हेडगेवार यांच्या भानगडीत पडलं नाही तर आपण समाजात सुरक्षित राहू शकतो.' यासारखी नाटकातली उपहासात्मक विधानं आजच्या सामाजिक वास्तवावर जळजळीत प्रकाशझोत टाकतात. बायको मोलकरीण इथं पटकथेत हे पात्र खासच श्याम मनोहरी! तिचं ब्राह्मण असणं आणि त्याचवेळी मोलकरीण असल्यानं [illegible] अशुद्ध बोलीत बोलणं- या विरोधाभासातून लेखक हवा तो परिणाम साध्य करतो. दिग्दर्शक दीपक राजाध्यक्ष यांनी श्याम मनोहर यांची उपहासगर्भ लेखनशैली नाट्यीकरणातही नेमकेपणानं अधिष्ठित होईल असं पाहिलं आहे. अगदी प्रारंभापासूनच त्यांनी हा सूर कलावंतांच्या वागण्या-बोलण्यातून, संवादोच्चारांतून आणि त्यांच्या देहबोलीतून साधून घेतला आहे. एवढंच नव्हे, तर त्यांच्या दर्शनी रूपातूनही तो दृग्गोचर होईल याची काळजी घेतली आहे. मात्र, लांबलेल्या आणि पुनरुक्तीपूर्ण पहिल्या अंकाला त्यांनी थोडी कात्री लावणं गरजेचं आहे. इथं पटकथा आणि आशा यांच्यातील 'माना'चं द्वन्द्व लावण्याचा प्रसंगही अनावश्यकरीत्या लांबला गेला आहे. पार्श्वसंगीत मात्र दिग्दर्शकाने आपलं कौशल्य दाखवलं आहे. सगळे कलावंत आपापल्या जागी फिट्ट आहेत.

नेपथ्य व प्रकाशयोजनाकार रवी- रसिक यांनी नाटकाचा आशय आणि वातावरणनिर्मितीतील आपली जबाबदारी चोख पार पाडली आहे. [illegible] प्रतीकात्मकतेतून बरंच काही सुचवलं आहे. अनंत अमेंबल यांचं पार्श्वसंगीत नाटकातला विरोधाभास अधोरेखित करायला मदत करतं.

दिनकररावांच्या भूमिकेत नंदू माधव यांचं बऱ्याच कालावधीनंतर रंगमंचावरचं आगमन त्यांच्या अभिनयक्षमतेला पुरेपूर वाव देणारं आहे. सामान्य माणसाच्या मानपानाच्या अवास्तव कल्पना, त्या पुऱ्या होत नाही म्हणून आलेलं खंतावलेपण, नोकरीत आणि इतरत्र सामान्य म्हणून पदोपदी होणारा अपमान, त्या अपमानांचा घरात मिळणाऱ्या मानामुळे होणारा विसर, [illegible] मान मिळवण्याचं समाजमान्य अडाणीपण... आणि सर्वसामान्यांना मान मिळवून देण्याच्या त्यांच्या उदात्त योजनेचं होणारं भजं... आणि त्यामुळे पुन्हा एकदा कर्तृत्वशून्य होणं... या साऱ्या अवस्थांचा रंगमंचीय ठोकदार अनुभव त्यांनी प्रेक्षकांना दिला आहे. रेखा कई आशाच्या भूमिकेत [illegible] नाटकात तरी नेमका सूर त्यांना गवसला आहे. सामान्य स्त्रीच्या मानापमानाच्या व्यथा-वेदनेतून सुटका मिळवण्यासाठीची त्यांची [illegible] आपल्यापर्यंत पोहचते. राजश्री टोपे यांनी [illegible] इथं पटकथेत मात्र त्याच-त्याचपणाच्या आवर्तात सापडली आहे. मनिषा कोर्डे [illegible] नंदिनीचा उपरोधिक स्वर छान पकडला आहे. प्रवीण झालेले जितेन मोकले [illegible] जागी अगदी चोख!

'सन्मान हौस'मध्ये रेखा कई आणि नंदू माधव.